CMYK



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना जयंतीनिमित्त अभिवादन

दैनिक **आरंभ मराठी**

www.arambhmarathi.com



पाणी प्रश्नावर राष्ट्रवादी आक्रमक

पेज ४

■ दैनिक ■ धाराशिव ■ वर्ष 2 रे ■ अंक 111 ■ शनिवार दि.31 मे 2025 ■ RNI NO -2023/90078 ■ पाने 04 ■ किंमत रू 5

# गोकुळ दूध संघाच्या अध्यक्षपदी नविद मुश्रीफ

## कोल्हापुरात महायुतीची खेळी ठरली यशस्वी

आरंभ मराठी | कोल्हापूर

कोल्हापूर जिल्हा दूध उत्पादक संघ अर्थात गोकुळच्या अध्यक्षपदी नविद मुश्रीफ यांची आज शुक्रवारी अधिकृत निवड करण्यात आली. गोकुळ शिरगाव येथील मुख्य कार्यालयात पार पडलेल्या संचालक मंडळाच्या विशेष बैठकीत नव्या अध्यक्षाची घोषणा करण्यात आली.माजी अध्यक्ष अरुण डोंगळे यांच्या राजीनाम्यानंतर निर्माण झालेल्या रिक्त जागेसाठी शशिकांत पाटील-चुयेकर यांचे नाव जवळपास निश्चित मानले जात होते. मात्र, महायुतीच्या प्रम ुख नेत्यांनी अध्यक्षपद आपल्याच गटात राहावे, यासाठी दबाव आणला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी थेट हस्तक्षेप करत हा डाव पलटवला.या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर गुरुवारी सायंकाळी कोल्हापुरात एक महत्त्वाची बैठक पार पडली. गोकुळचे वरिष्ठ नेते आणि महायुतीचे मंत्री व आमदार या बैठकीला उपस्थित होते.

सुमारे अडीच तास चाललेल्या या चर्चेमध्ये शशिकांत पाटील-चुयेकर यांचे नाव मागे घेण्यात आले आणि नविद मुश्रीफ यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. विशेष म्हणजे नविद मुश्रीफ हे काही दिवसांपूर्वीपर्यंत परदेश दौऱ्यावर होते. सुरुवातीला त्यांच्या वडिलांनी म्हणजेच मंत्री हसन मुश्रीफ यांनी अध्यक्षपद देण्यास अनिच्छा व्यक्त केली होती. मात्र, मुख्यमंत्री फडणवीस यांच्या सूचनेनंतर त्यांनीही आपली भूमिका बदलली. आजच्या निवडीमुळे काँग्रेस जिल्हाध्यक्ष व आमदार सतेज पाटील यांना मोठा धक्का बसला आहे. त्यांनी सुचवलेले चुयेकर यांचे नाव अंतिम क्षणी मागे पडल्यामुळे गोकुळवरचा त्यांचा प्रभाव आता कमी झाल्याचे मानले जात आहे. नविद मुश्रीफ यांच्या निवडीमुळे कोल्हापुरातील सहकार क्षेत्रात नव्या पिढीचे नेतृत्व उदयास येत आहे. मुश्रीफ कुटुंबाचे गोकुळवरचे वर्चस्व पुन्हा अधोरेखित झाले असून, पुढील राजकीय समीकरणांवर या निवडीचा मोठा परिणाम होणार आहे.







### उत्पादक शेतकऱ्यांना जास्तीत जास्त दूध दर देण्यासाठी कटिबद्ध-नविद मुश्रीफ

निवडीनंतर गोकुळचे नूतन चेअरमन नविद मुश्रीफ म्हणाले की, गोकुळ दूध संघाच्या चेअरमनपदी माझी एकमताने निवड करून जो विश्वास माझ्यावर दाखवण्यात आला आहे. त्याबद्दल मी शाहू आघाडीचे सर्व नेतेमंडळी,माझे सहकारी संचालक मंडळ तसेच माझ्या शेतकरी बांधवांचे मनपूर्वक आभार मानतो. मी भविष्यात काम करीत असताना दूध उत्पादक शेतकऱ्यांना जास्तीत जास्त दूध दर देण्यासाठी कटिबद्ध असून दूध संकलन, प्रक्रिया आणि विक्री व्यवस्था अधिक पारदर्शक व कार्यक्षम राबूवन नव्या तंत्रज्ञानाचा, व्यवस्थापन प्रणालींचा समावेश करून गोकुळची गुणवत्ता आणि ब्रँडची विश्वासार्हता राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर नेणार आहे. तसेच दुग्ध व्यवसायामध्ये महिला व युवा शेतकरी अधिक सक्रिय होण्यासाठी त्यांना गोकुळमार्फत प्रोत्साहन देण्याचा माझा प्रयत्न असेल. याचबरोबर गोकुळचे वाहन न वापरण्याचा निर्णयही त्यांनी यावेळी जाहीर केला.

### अभिनंदनाची पोस्ट चर्चेत

नविद मुश्रीफ यांच्या निवडीनंतर मुश्रीफ समर्थकांनी कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती बँक व गोकुळच्या प्रांगणात गुलाल उधळत कार्यकर्त्यांनी जल्लोष केला.यानंतर काही वेळामध्येच शौमिका महाडिक आणि आम दार अमोल महाडिक यांनी त्यांच्या अभिनंदनाची पोस्ट केली. त्यामुळे राजकीय भुवया उंचावल्या आहेत. विरोधी शौमिका महाडिक यांनी गोकुळच्या नेत्यांना धारेवर धरत तसेच गोकुळच्या सर्वसाधारण सभेतून अत्यंत आक्रमकपणे भूमिका मांडली आहे. सातत्याने प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यामुळे सत्ताधाऱ्यांच्या कार्यपद्धतीवर तुटून पडणाऱ्या शौमिका महाडिक यांनी थेट अभिनंदनाची पोस्ट केल्याने चांगली चर्चा रंगली आहे.

या निवडीमुळे नविद मुश्रीफ यांची गोकुळ दूध संघाच्या स्थापनेपासून सर्वात तरुण अध्यक्ष म्हणून नोंद झाली आहे. तसेच आजपर्यंत अध्यक्ष झालेल्यांमध्ये पहिल्याच टर्ममध्ये अध्यक्षपदी निवड झाल्याचीही नोंद त्यांच्या नावावर झाली आहे.

# राज्यात धाराशिव जिल्ह्यात सर्वाधिक ४२.२ मिमी पाऊस

मुंबई : राज्यात मागील २४ तासांमध्ये (३० मे रोजी सकाळपर्यंत) धाराशिव जिल्ह्यात सर्वाधिक ४२.२ मिमी पाऊस झाला आहे. तर बीड २४ मिमी, जालना १३.९ मिमी, सोलापूर १२.१ मिमी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात ११.२ मिमी पावसाची नोंद झाली आहे.राज्यात कालपासून आज ३० मे रोजी सकाळपर्यंत झालेल्या पावसाची सरासरी आकडेवारी पुढीलप्रमाणे (सर्व आकडे मिलिमीटरमध्ये) :- रायगड ०.३, रत्नागिरी ३.९, सिंधुदुर्ग ११.२, पालघर ०.१, नाशिक ०.६, धुळे ०.४, जळगाव ०.१, अहिल्यानगर ०.५, सोलापूर १२.१, सातारा १, सांगली ०.९, कोल्हापूर ०.८, छत्रपती संभाजीनगर ०.६, जालना १३.९,बीड २४, लातूर ५.१, धाराशिव ४२.२, नांदेड ९.३, परभणी ३, हिंगोली ०.२, बुलढाणा २.२, अकोला ०.१, वाशिम ०.२, अमरावती ३.४, यवतमाळ ६.५, वर्धा ८.७, नागपूर १.४, भंडारा ०.७, गोंदिया ३.९, चंद्रपूर १.२ आणि गडचिरोली २.५. धाराशिव जिल्ह्यामध्ये अतिवृष्टीमुळे वाहतुकीचे मार्ग बदलण्यात आले. मात्र पावसामुळे कोणतीही जीवित हानी झालेली नाही. आंबोली घाट मार्गावर वाहतूक सुरळीत सुरूसिधुदुर्ग जिल्ह्यातील आंबोली घाटात रस्त्यावर दरड कोसळली राष्ट्रीय महामार्ग आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पथकाने रस्त्यावरील कोसळलेली दरड हटवली असून या मार्गावर वाहतूक सुरळीतपणे चालू आहे. इंडो अमाइनस कंपनीतील वायू गळती बंदमहाड येथील इंडो अम इनस या कंपनीमध्ये वायू गळतीमुळे एक कामगार जखमी झाला आहे. सध्या वायू गळती बंद असून परिस्थिती नियंत्रणात असल्याचे राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून सांगण्यात आले.दिनांक २९ मे २०२५ रोजी ठाणे जिल्ह्यात रस्ता अपघात घटनेत एक व्यक्ती, नांदेड जिल्ह्यात पाण्यात बुडून दोन व्यक्ती मृत झाल्या आहेत. तर सोलापूर जिल्ह्यात भिंत पडून चार व्यक्ती जखमी झाल्या आहेत. राज्यात सर्व जिल्ह्यात पावसाची नोंद झालेली आहे. सद्यस्थितीत परिस्थिती नियंत्रणात असून कुठेही पूरपरिस्थिती उद्भवलेली नाही. राज्य आपत्कालीन कार्य केंद्र सर्व जिल्हा आपत्कालीन कार्यकेंद्रांच्या सातत्याने संपर्कात आहे. पूरपरिस्थितीबाबत उपाययोजना म्हणून प्रशासनातर्फे एनडीआरएफ व एसडीआरएफ पथकांना आपत्कालीन परिस्थितीकरिता सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या असल्याचे राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून सांगण्यात आले.

# लाखनगाव येथून सात किलो गांजा जप्त;एक आरोपी ताब्यात


आरंभ मराठी | धाराशिव

वाशी तालुक्यातील लाखनगाव येथे अवैध गांजा विक्रीसाठी जवळ बाळगणाऱ्यावर व्यक्तीला ताब्यात घेऊन त्याच्याकडील दीड लाख रुपये किंमतीचा सात किलो गांजा जप्त केला. यासंबंधी सविस्तर वृत्त असे की, आरोपी फुलचंद साहेबा शिंदे (रा. लाखनगाव ता. वाशी) हे २९ मे रोजी दुपारी अडीच वाजण्याच्या सुमारास आपल्या राहत्या घरात ७.०१० कि. ग्रॅम वजनाचे अंदाजे १,४०,२०० रुपये किंमतीचा हिरव्या रंगाचा ओला सुका उग्र वास येत असलेला गांजा विनापरवाना विक्री करीता जवळ बाळगलेला वाशी पोलीसांना मिळून आला. यावरुन पोलीसांनी अंमली पदार्थ जप्त करुन त्याच्याविरुद्ध गुंगीकारक औषधी द्रव्य आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे अधिनियम १९८५ कलम- ८ (क), २० (ब) अन्वये वाशी पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे. दोन दिवसांपूर्वी परंडा शहरात गांजाचे सेवन करून विक्री करणाऱ्या नऊ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर सलग दुसऱ्या दिवशी जिल्ह्यात गांजा सापडला असल्यामुळे जिल्ह्यात खळबळ माजली आहे. नवनियुक्त पोलीस अधीक्षक रितू खोकर यांनी अंमली पदार्थाच्या विरोधात आणि गावठी दारू विरोधात मोहीम तीव्र केली आहे. मागील चार दिवसात गावठी दारूच्या विरोधात आणि गांजा सेवन व विक्रीविरोधात मोठ्या कारवाया केल्या आहेत.

# अवैध मद्य विरोधी सात छापे; पन्नास हजारांचा मुद्देमाल जप्त

आरंभ मराठी | धाराशिव

नवनियुक्त पोलीस अधीक्षक रितू खोकर यांनी नियुक्तीनंतर जिल्ह्यातील गावठी दारू विरोधात कडक कारवाई सुरू केली आहे. मागील चार दिवसात चार मोठ्या कारवाई करून पंचवीस पेक्षा अधिक छापे टाकण्यात आले आहेत. गुरुवारी (दि.२९) अवैध मद्य विरोधी सात छापे टाकण्यात आले. या छाप्यात घटनास्थळावर आढळलेले ३६० लिटर गावठी दारु निर्मीतीचे गुळमिश्रीत रासायनिक द्रव, ७९ लिटर गावठी दारु, २५ लिटर सिंधी ताडी अम्ली द्रव व



देशी विदेशी दारुच्या ५५ सिलबंद बाटल्याअसे मद्य जप्त करण्यात आले. जप्त करण्यात आलेल्या मद्याची एकत्रीत किंमत अंदाजे ४७,५२५ रुपये आहे. यावरुन महाराष्ट्र मद्य मनाई कायद्यांतर्गत येरमाळा, लोहारा, आनंदनगर, मुरुम या पोलीस ठाण्यात सात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

# कुंभारी येथे पहिल्या कुणबी मराठा महिला सरपंच

आरंभ मराठी | तुळजापूर

मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली मराठा समाजाच्या झालेल्या आंदोलनानंतर शिंदे समितीच्या ज्या कुणबी नोंदी मिळाल्या त्याम ध्ये सोलापूर जिल्ह्यातील पोखरापूर येथील वर्षाराणी सत्यवान दळवे सासरचे नाव वर्षारानी संतोष वडणे यांची कुणबी मराठा नोंद सापडली होती. त्यानंतर त्यांना इतर मागास प्रवर्गातील कुणबी नोंदीचा दाखलाही मिळाला होता. याच दाखल्यावर तुळजापूर तालुक्यातील कुंभारी येथील रिक्त झालेल्या सरपंच पदाच्या



निवडीमध्ये वर्षाराणी सत्यवान दळवे यांची सरपंचपदी निवड झाली आहे. विराट आंदोलनानंतर कुणबी मराठा समाजाची पहिली महिला सरपंच होण्याचा मान वर्षाराणी दळवे -वडणे यांना मिळाला आहे. त्यानिमित्त सकल मराठा समाज तुळजापूर तालुक्याच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सकल मराठा समाजाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कंत्राटी शिक्षकांना सरळ सेवेत समावून घ्या

## अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाची मागणी


आरंभ मराठी | धाराशिव

१० वर्षे सेवा पूर्ण झालेल्या राज्यातील कंत्राटी शिक्षकांना सरळ सेवेत सामावून घेण्याची मागणी अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. शिक्षक संघाच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, राज्यातील कंत्राटी शिक्षक असून, शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून कार्यरत आहेत, आम्ही कंत्राटी बेसवर अत्यंत तुटपुंज्या पगारावर काम काम करत आहोत. तसेच सध्याची महागाई पाहता सदर कंत्राटी शिक्षकांना स्वतःचे घर देखील चालविणे अत्यंत कठीण होत आहे, त्यातच मुलांचे शिक्षण, दवाखाना खर्च व अन्न-पाणी अश्या खुप अडचणी निर्माण होत असून सद्यस्थितीत उपासमारीची वेळ आली आहे. कांही जणांचे लग्न होत नसून जगण्यासाठी खुप अडचणींचा सामना करावा लागत आहे. कांही कंत्राटी शिक्षकांनी घर बांधण्यासाठी, त्यांचे मुलांचे शिक्षणासाठी व त्यांचे मुलांचे लग्नासाठी बँकेकडून घेतलेले कर्ज परत फेडायला जमत नसल्याने भितीपोटी कांही शिक्षक मरण पत्करत आहेत. सदर शिक्षकांचे मानसिक खच्चीकरण होत आहे. तसेच कांही शिक्षकांना टेन्शनने बऱ्याच प्रकारचे आजार होत आहेत. अशा परिस्थितीत अजून कितीतरी शिक्षकांचा बळी जाईल. भरतीमध्ये कंत्राटी शिक्षकांना प्रथम प्राधान्य देऊन त्यांना कायम नियुक्ती देण्यात यावी, ज्या संस्थेला अनुदान देण्यास कांही अडचण आली तर कंत्राटी कर्मचाऱ्यांना जिल्हा परिषद शाळेवर नविन शिक्षक भरतीत सामावून घ्यावे. निवेदनावर कंत्राटी शिक्षक संघाचे अजयकुमार यादव, राज्य नेते बशीर तांबोळी, गणपतराव चव्हाण, बाळासाहेब कुलकर्णी, थोरात सर, कोरडे सर यांच्या स्वाक्षरी आहेत.

# पावसाने भांडगाव-बार्शी मार्गावरील पूल गेला वाहून

आरंभ मराठी | जवळा

परंडा तालुक्यातील भांडगावमार्गे बार्शीला जाणाऱ्या रोडवरील पूल मुसळधार पावसाने वाहून गेला. सद्य परिस्थितीमध्ये बार्शीला जाण्यासाठी हा जवळचा मार्ग असल्याने याच रोडने पाथरूडपासून जवळा, माणकेश्वर, भांडगावच्या नागरिकांना बार्शीला जाण्यासाठी जवळचा मार्ग आहे. भांडगाव येथील विश्वरूपा नदीला मुसळधार पावसाने पूर आल्यामुळे रोडची दुरवस्था होऊन पूल वाहून गेला. भांडगाव येथील विश्वरूपा नदीवरील नवीन पुलाचे काम चालू असल्यामुळे सर्विस रोड म्हणून नवीन माती काम करून दोन नळ्या टाकून पुलाची व्यवस्था करण्यात आली होती.



मात्र,हा पूल निकृष्ट दर्जाचा असल्यामुळे आणि मजबूत नसल्याने तो मुसळधार पावसाने वाहून गेला. परंडा येथील तहसीलदार निलेश काकडे, सार्वजनिक बांधकाम विभाग इंजिनियर ऐश्वर्या वडगावे, ग्राम महसूल अधिकारी विजय खोसे (जवळा नि), ग्राममहसूल अधिकारी संध्या सोनवणे तसेच सर्व अधिकाऱ्यांनी पुलाची पाहणी केली.

# जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी कल्पना मांडा

## 'मित्रा'चे उपाध्यक्ष आमदार राणा पाटील यांचे अधिकाऱ्यांना निर्देश

आरंभ मराठी | धाराशिव

जिल्ह्याच्या सर्वांगीण आणि शाश्वत विकासासाठी अधिकाऱ्यांनी केवळ नियमित कामकाजापुरते मर्यादित न राहता सकारात्मक दृष्टिकोनातून नवकल्पना मांडाव्यात,असे निर्देश मित्राचे उपाध्यक्ष आमदार राणाजगजीतसिंह पाटील यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीला अप्पर जिल्हाधिकारी ज्योती पाटील, उपजिल्हाधिकारी शिरीष यादव, संतोष राऊत, अरुणा गायकवाड, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.धनंजय चाकूरकर, जिल्हा रोजगार व कौशल्य विकास उद्योजकता विभागाचे सहायक आयुक्त संजय गुरव, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता थोरात, जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता नाईक, सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी श्रीकांत कुंटला, शिक्षण विभागाचे विस्तार अधिकारी बालाजी येरमूडवार, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठता डॉ.शैलेश चव्हाण, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक निखिल पाटील, क्रीडा अधिकारी नाईकवाडी, जिल्हा अग्रणी बँक अधिकारी चिन्मय दास, तुळजापूरचे तहसीलदार अरविंद बोळंगे, एमएसईबीच्या कार्यकारी अभियंता निलांबरी कुलकर्णी, महसूलचे तहसीलदार अभिजीत जगताप, पर्यटन विभागाचे उपअभियंता, एमआयडीसीचे परिक्षेत्र अधिकारी यांची उपस्थिती होती. आमदार पाटील यांनी अलीकडेच सोलापूर-तुळजापूर-धाराशिव रेल्वे महामार्ग, तामलवाडी औद्योगिक वसाहत आणि विविध क्षेत्रातील महत्त्वाकांक्षी योजनांचा आढावा घेतला. या बैठकीत त्यांनी जिल्ह्याच्या औद्योगिक, वैद्यकीय, धार्मिक, पर्यटन, रोजगार, सिंचन आणि क्रीडा क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी एक व्यापक काम करून त्यामध्ये नवकल्पना मांडाव्यात अशा सूचना दिल्या. तामलवाडी औद्योगिक वसाहतीत सुमारे दीडशेहून अधिक मध्यम व लघुउद्योग उभारण्याचा मानस असून, यामुळे स्थानिक पातळीवर मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होणार आहे.याशिवाय फोर्टी येथे अधिक वसाहत उभारून रोजगाराच्या संधी वाढवण्याचे उद्दिष्ट आहे. कळंब तालुक्यातील शिराढोण येथे नवीन औद्योगिक वसाहत उभारण्याच्या दृष्टीने पावले उचलली जाणार आहेत. वैद्यकीय महाविद्यालय व सामान्य रुग्णालय उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.यामुळे आरोग्य सेवांमध्ये सुधारणा होणार असून, वैद्यकीय शिक्षणासाठीही जिल्ह्याला नवीन दिशा मिळणार आहे. श्री क्षेत्र येरमाळा येथे धार्मिक पर्यटनाच्या दृष्टीने विशेष विकास आराखडा राबवून ते केंद्र उभारण्याची योजना आहे. तसेच पर्यटन विभागाला त्यांनी येरमाळा येथे प्राथमिक पायाभूत सुविधा निर्माण करण्याच्या दृष्टीनेही काम करावे,असे निर्देश दिले.

येडशी येथील रामलिंग तीर्थक्षेत्र व अभयारण्याचा विकास करून त्याला जागतिक पर्यटनाच्या नकाशावर स्थान देण्याचा संकल्प करण्यात आला आहे. तुळजापूर




येथील शक्तिपीठाच्या माध्यमातूनही धार्मिक पर्यटनास चालना देण्यात येईल. कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्प, मांजरा व तेरणा नदीवर बॅरेज बांधणे, निम्न तेरणा प्रकल्प आणि सुरत-चेन्नई महामार्ग यासारख्या महत्त्वाच्या पायाभूत सुविधांचा आढावा घेऊन त्याची अंमलबजावणी जलदगतीने करण्याचे निर्देश देण्यात आले. यामुळे शेतीसाठी शाश्वत सिंचनाची सोय निम र्ाण होणार आहे. प्रधानमंत्री रोजगार निर्मिती योजना, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजना व इतर शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी करून युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. तसेच या योजनेच्या माध्यमातून जिल्ह्यात १०० ड्रोनचे ऑपरेटर तयार करणे त्यासाठी त्यांना कर्ज उपलब्ध होते का याबाबत अधिकाऱ्यांनी प्रयत्न करणे गरजेचे असल्याचेही त्यांनी यावेळी म्हटले. धाराशिव जिल्ह्यात क्रीडा संकुलाची उभारणी करण्यात येणार असून, आपत्ती व्यवस्थापनासाठी आवश्यक तंत्रसज्ञता आणि केंद्र स्थापन करण्याच्या दृष्टीने नियोजन सुरू आहे. या बैठकीस जिल्ह्यातील विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त आज कार्यक्रम

## पशुसंवर्धन विभागामार्फत कार्यक्रमांचे आयोजन

मुंबई: पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य, विचार आणि प्रेरणादायी जीवनगाथा जनसामान्यांपर्यंत प्रभावीपणे पोहचविणे आवश्यक असल्याने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंती दिनाचे औचित्य साधून ३१ मे २०२५ रोजी पशुसंवर्धन विभागामार्फत राज्यभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी दिली.पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या भारतीय इतिहासातील एक तेजस्वी, कर्तबगार व दूरदृष्टी असणाऱ्या स्त्रीशक्तीचे प्रतिक आहेत.त्यांनी धार्मिक सहिष्णुता, सम ाजकल्याण, सार्वजनिक बांधकाम, न्यायप्रविष्ट प्रशासन आणि स्त्री शिक्षणाच्या माध्यमातून आदर्श राज्यकारभाराची उभारणी केली. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य समाजसेवा, धर्मनिष्ठा आणि कुशल प्रशासनाचे प्रतीक असून, ते महाराष्ट्र राज्याच्या प्रगत व उन्नत वाटचालीसाठी नेहमीच पथदर्शी ठरले आहे. यास अनुसरुन ''पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर'' यांच्या ३०० व्या जयंती वर्षानिमित्त पशुसंवर्धन विभागामार्फत अधिनस्त संस्थांमध्ये कार्यालय/ दवाखाना परिसर स्वच्छता व सुशोभिकरण करणे, गाव पातळीवर वंधत्व / सर्वोपचार शिबिरांचे आयोजन करणे, फिरस्ती मेंढपाळांची भेट घेऊन त्यांना तांत्रिक मार्गदर्शन करणे, मेंढपाळांच्या शेळ्या-मेंढ्यांचे मान्सून पूर्व लसीकरण करणे, पशुधनाचे जंतनिर्मूलन, गोचीड निर्मूलन, करडे / कोकरे मरतूक कमी करणेबाबत उपाययोजना करणे, मेंढपाळांसाठी तांत्रिक मार्गदर्शन करण्यासाठी शिबिर / परिसंवादाचे आयोजन करणे, वृक्ष लागवड करणे इत्यादी उपक्रम राबविण्यात यावेत, अशा सूचना मंत्री श्रीमती मुंडे यांनी दिल्या आहेत.पशुसंवर्धन आयुक्त रामस्वामी एन आणि पशुसंवर्धन आयुक्त डॉ. प्रवीणकुमार देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली ''पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर'' यांच्या ३०० व्या जयंती वर्षानिमित्त विभागाच्या मुख्यालयातही अभिवादनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.

# आयुष्याचं घोडं अखेर गंगेत न्हालं..

गंगेत घोडं न्हालं '' हा वाक्यप्रचार शालेय विद्यार्थी असताना अभ्यासला गेला होता. या वाक्प्रचाराचा प्रचलित अर्थ म्हणजे खुप प्रयासाने सफल होणे, प्रयत्नांती यश मिळवणे,कृतकृत्य होणे,कृतार्थ झाले असे वाटणे,एखादे खुप अवघड व रखडलेले काम एकदाचे पार पडले म्हणुन निश्वास सोडणे, धन्य झालो असे वाटणे. आता यात गंगेचा काय संबंध?गंगाचं का आली या वाक्यप्रचाराच्या कामी? असे प्रश्न मनाच्या गंगेत अगदी सहज डुबकी मारून गेले.भगीरथ हा इक्ष्वाकु वंशाचा एक महान राजा होता. त्याने गंगा नदी स्वर्गातून पृथ्वीवर आणली कारण केवळ तीच भगीरथाच्या पूर्वजांना निर्वाण देऊ शकत होती ज्यांना कपिलऋषींनी शाप दिला होता.

आपल्या मृत पूर्वजांना (सगरांच्या पुत्रांना) मुक्ती मिळवून देण्यासाठी भगीरथाने महत्प्रयासाने गंगेला पृथ्वीवर आणले,असे मानले जाते. वर्षानुवर्षे कठोर तपश्चर्येनंतर, गंगा नदी पृथ्वीवर अवतरली आणि भगवान शिव तिचा प्रवाह नियंत्रित करण्यास तयार झाले. त्यामुळेआपल्याकडे पराकाष्ठेच्या प्रयत्नांना भगीरथ प्रयत्न म्हणतात.म्हणून गंगा ही भारतील पवित्र नदी झाली. भारतातील उत्तराखंड राज्यात हिमालय पर्वतातात गंगेचा उगम हा गंगोत्री या हिमनदीतून होतो.गंगेच्या मुख्य दोन नद्या आहेत भागीरथी आणि अलकनंदा.जेव्हा भागीरथी नदी १७५ किमीचा प्रवास पूर्ण करते त्यावेळेस अलकनंदा तिला मिळते आणि त्यापुढे ती गंगा या नावाने ओळखली जाते. या गंगा तीरी वाराणसी अर्थात काशी पवित्र स्थान आहे.काशी, की जिला वाराणसी व बनारस ही म्हटलं जात.एक अत्यंत प्राचीन शहर जे गंगा नदी काठी आहे.

एक प्रमुख तीर्थक्षेत्र आहे. मोक्ष नगरी भी म्हटलं जात.पौराणिक संदर्भानुसार,काशीची स्थापना स्वतः भगवान शिव ने केली



आहे. आणि ५००० हून अधिक वर्षोंपासून ही अस्तित्वात आहे.स्कन्द पुराण, रामायण व महाभारतासह प्राचीनतम ऋग्वेद मध्ये काशी नगरचा उल्लेख येत आहे. काशी हे प्रकाशाचे शहर आहे. ऋग्वेदात त्याला काशी म्हटले आहे, जे संस्कृत मूळ कास म्हणजेच 'चमकणे' या शब्दापासून आले आहे. हा ज्ञानप्राप्तीचा प्रवेश आहे. काशीची स्थापना भगवान शिवानेच केली होती. लोक येथे पुनर्जन्म अनुभवण्यासाठी गर्दी करतात, गंगेच्या प्रवाहात आपले पाप सोडून,पराक्रमी भगवान शिवासमोर येतात. असे म्हटले जाते की गंगा पृथ्वीवर नाही तर लाखो श्रद्धाळूंच्या मनात वाहते. गंगेच्या काठावर असलेले काशी हे या आत्म्याचे प्रकटीकरण आहे. आणि नेमके हेच आत्मे मोक्षाच्या त्रिस्थल यात्रेचा पाया रचतात. सात दिवसांत, मोक्ष आपल्या यात्रींना इतिहास,परंपरा आणि सर्वोत्तम कलेच्या गल्लीबोळातून घेऊन जाईल.ही यात्रा श्रद्धा,श्रद्धा आणि कल्पनाशक्तीच्या भव्य भूमीवर सुरू होते.प्रयाग,जिथे दोन खऱ्या नद्या आणि एक अदृश्य नदी त्रिवेणी येथे एकत्र येते.तेव्हापासून, हा प्रवास गंगेच्या प्रवाहांनी आलिंगन घेतलेल्या बोटीसारखा वळवळतो,जीवनाच्या मंद गतीला आत्मसात करतो आणि गुरुंच्या अमर ज्ञानात भिजतो, कालातीत क्लासिक्स ऐकतो.पूजा,ध्यान सत्रे,सत्संग आणि विद्वानांशी संवाद मोक्षाच्या त्रिस्थल यात्रेला एक अद्वितीय आणि विशेष अनुभव बनवतात. काळभैरव मंदिर, महामृत्युंजय मंदिर, विशालाक्षी मंदिर,मणिकर्णिका घाट,गंगाघाट, हरिश्चंद्र घाट, अहिल्याबाई घाट,दशाश्वमेध घाट, असि घाट, मणिकर्णिका घाट, पंचगंगा घाट, केदार घाट,नमो घाट, गंगा महल घाट, ललिता घाट, रामघाट, आणि तुलसीघाट. अग्नीश्वरघाट,अहल्यादेवीघाट,गायघाट, चिताघाट(स्मशानघाट),चौसष्टीघाट,जानकीघाट,त्रिलोचनघाट,दुर्गाघाट,नारदघाट,प्रल्हादघाट, ब्रह्माघाट,भोसलाघाट, महताघाट, मानससरोवरघाट,मीरघाट,मुन्शीघाट, राजघाट,राजमंदिरघाट,लक्ष्मण-बालाघाट, लालघाट आणि ललीघाट. अशा अनेक एकूण ८८ घाटावर येथे यात्री थांबतात,मंत्रमुग्ध करणाऱ्या मंगला आरतीचे साक्षीदार होऊन काशी विश्वनाथ मंदिर आणि महाबोधी मंदिरात स्तब्ध होतात. काशी विश्वनाथ मंदीरातील भक्तांचे,सोयींचे नियोजन सुरक्षा व्यवस्था ,स्वच्छता थंड पेय जल, आदी सुविधा प्रशासनाकडून उत्तम ठेवल्या होत्या.

हे अनुभवून खूप छान वाटले.दर्शनाने समाधान वाटले.तब्बल सात आठ महिन्यांच्या प्रदीर्घ प्रतिक्षेनंतर माझी मुलगी सौ. प्रतिक्षा,जावई धन्यकुमार काळे (फौजी) अयोध्ये वरून गावी सुट्टीला येणार.परंतू पहलगाम घटनेनंतर सैनिकांच्या सुट्टया रद्द झाल्या.सारं चित्रच बदलून गेले. ऑपरेशन सिंदूर नंतरआता थोडं वातावरण निवळू लागले, जावयांनी आता त्यांच्या सीओ समोर सुट्टीचे कारण सांगीतले की, माझे सासरे शिक्षक आहेत, परत त्यांना सुटटी नसते, त्यांना मला अयोध्या काशीयात्रा घडवून आणायची आहे. तिकीटांचे आरक्षण मार्चमध्येच करून ठेवले आहे.शिक्षकाबद्दल आजही आदर आहे. म्हणून की काय,त्यांनी ३० दिवसाची सुट्टी मंजूर केली. ती ही सुट्टीतील पाहिले १० दिवस मुख्यालय सोडायचे नाही या अटीवर. जावईंनी ती अट मान्य केली. पहिल्या १० दिवसात ही पर्यटन यात्रा करावी व परत राहिलेल्या पंधरा दिवसाच्या सुटटीसाठी गावे जावे. असे नियोजन करून त्यांचे कुंटुब अयोध्यत मुख्यालयी ठेवलं.आणि एकटेच वैरागला आमच्याकडे आले,आम्हांला घेऊन अयोध्येला गेले.

म्हणून आम्ही लेक जावईच्या भेटीला दिनांक २४ मे २०२५ रोजी अयोध्येला निघण्याचा योग आला.अयोध्ये पर्यंत रेल्वेने आणि पुढील यात्रा कारने अशी ही मोक्ष दायिनी पवित्र काशीयात्रा करण्याचा आयुष्यात योग आला तो माझ्या कन्येमुळे. जावई धन्यकुमार व मुलगी प्रतिक्षा यांची आर्मीमध्ये पोस्टींग अयोध्येत असल्यामुळे मुलीकडे आठवडाभर राहून अयोध्या,प्रयागराज आणि अनमोल अशी काशीयात्रा लेक जावई नातवंड आणि शंभूराजेसह सपत्नीक घडून आली.या पूर्वीही जावई अहमदाबाद येथे पोस्टींगला असल्याने जाण्याचा योग आला तेव्हा ही गुजरात येथील महात्मा गांधीजींचा साबरमती आश्रम तर दिल्ली येथे पोस्टींग असताना दिल्ली दर्शन,आग्रा ताजमहाल, राजघाट, मथूरा,वृंदावन असे पर्यटनयात्रा झाल्या.आता अयोध्या, गुप्तार घाट, शरयू, राममंदीर, प्रयागराज - गंगा यमुना सरस्वती संगम, प्रयागराज किल्ला, वाराणसी काशी, या पवित्र यात्रा घडववून आणल्या त्या केवळ लेक जावई यांनीच. आमच्यासाठी त्यांनी सुटटी काढली.एक दिवस पर्यटन दुसऱ्या दिवशी त्यांच्या आर्मीच्या कौंटुबिक अशा प्रशस्त हेडक्वार्टरमध्ये विश्रांती.असा एक दिवसाड पर्यटनयात्रा व विश्रांतीमुळे प्रवासयात्रा सुखाची व काशी यात्रा आनंदाची झाली.ती केवळ लेक जावई यांच्यामुळेच.सध्या धावपळीच्या आणि व्यस्त जीवनशैलीमुळे माणुस आनंदी जगायचचं विसरून गेलाय. आणि पूर्वी इतकी सुरक्षाही राहिली नाही.पूर्वी भौतिक साधने कमी होती परंतु पर्यटन सुरक्षित होतं. आता भौतिक साधनांचा सुकाळ आहे परंतू सुरक्षिततेची हमी नाही. अशा वेळी ही आमची आनंदयात्रा सफल झाल्याने खूप समाधानाने आयुष्याचं घोड अखेर गंगेत न्हालं. त्याबद्दल मुलगी प्रतीक्षा व जावई फौजी धन्यकुमार यांना खूप खूप धन्यवाद आणि आशीर्वाद.. !

**हरिश्चंद्र खेंदाड.**
**( गडकाव्यांजलीकार )**

## जळणारे प्रेत

रात्रीची ती भयाण शांतता
भासतो भकास निर्जन रस्ता
मध्येच गावातले कुत्रे भुंकतेय
स्मशानात एक प्रेत जळतेय

जळणारे ते प्रेत कोणाचे?
असेल कोण्या भल्या माणसाचे
जीवनात केले कर्म चांगले
माणुसकीला नेहमीच जपले

जळणारे ते प्रेत कोणाचे?
असेल एखाद्या वाईट व्यक्तीचे
जीवनात नेहमी कुकर्म केले
म्हणून मृत्यूने अवेळी गाठले

जळणारे ते प्रेत कोणाचे?
असेल कोणाच्या वडिलांचे
शेवटपर्यंत बाप कळत नसतो
जीवंतपणी जपायचा असतो

जळणारे ते प्रेत कोणाचे?
असेल एखाद्याच्या आईचे
मायेचा न आटणारा झरा ती
कुटुंबाला प्रेमाने जपणारी ती

जळणारे ते प्रेत कोणाचे?
कोणाच्या बहिणीचे की भावाचे
जीवाला जीव देणाऱ्याचे
प्रसंगी लटके भांडणाऱ्याचे

जळणारे ते प्रेत असो कोणाचेही
स्मशानात एकटाच जळतोय
अनंतात शांतपणे विलीन होतोय
जाताना जीवनाचे मर्म सांगतोय

जीवनाचा काही नसतो भरवसा
प्रत्येक क्षण आनंदाने जगावा
लबाडी,खोटेपणा अजिबात नको
कष्टाची भाकर खा,भ्रष्टाचा नको.

**बबन दामोदर गुळवे**
**उमरगा कोर्ट**
**ता.अहमदपूर जि.लातूर.**
**मो.९५४५४४२६४८.**

# सरिता कधी करते का खंत

मी एक सरीता( नदी) आहे.माझा जन्म एका पर्वत, डोंगर दरी यातून झाला आहे.माझे लहानपणा डोंगराच्या कुशीत हिरव्या गर्द झाडीत गेले आहे. सुंदर वेली,झाडी, लहान लहान झरे यांच्या बरोबर खेळत खेळत मी पुढे पुढे जात असते.डोंगर दरीतून उतरून मी खुले मैदानात येऊन वाहत येऊन विस्तीर्ण पात्रात आल्या नंतर माझा वेग ( गती) थोडी कमी होत असते.माझ्या दोन्ही काठावर कित्येक गावे आणि शहरे बसलेली आहेत. मी त्या सर्वांना पाणी देत आले. तसेच पशू-पक्षी ,वन्यजीव या सर्वांची मी तहान भागवते. कधी कधी जास्तीचे पर्जन्य होते,तेव्हा मी पात्राच्या बाहेर जाऊन पूरस्थिती निर्माण होते.त्यावेळेस मला खंत वाटते ,त्यावेळी माझ्या काठावर बसलेले गाव,शहरे माझ्या पाण्यात बुडून जातात,शेतीचे नुकसान होऊन माती ,पीक ,धान्य वाहून जाते त्यावेळी मला खूप वेदना होतात. पुराच्या पाण्यात कधी कित्येक माणसे,जनावरे बुडून मरतात. अशी अनेक संकटाचे कारणे म्हणून मला दोषी ठरवले जाते.त्यामुळे मला फार दु:ख होते.आज माझ्यावर अनेक ठिकाणी धरणे ,तलाव, बांध बांधून माझे पाणी आडवले आहे.ठीक ठिकाणी पाट,कालवे काढून शेतीसाठी,पिण्यासाठी पाणी घेतले जाते.पाणी टंचाई झाली की,दोष माझ्या माथी मारले जातात. माझ्यामुळे सर्व सृष्टी सुंदर व निसर्गरम्य, हिरवेगार होत आहे .त्यामुळेच बाहेरून येणारे पर्यटक, विदेशी पाहुणे येतात. '' सदा सर्वदा वाहत राहणे हा माझा जीवन मंत्र आहे.''! मी वाहत वाहत शेवटी माझ्या सागरास जाऊन मिळते.यामुळेच मला' लोकमाता ' म्हणतात. परंतू पण लोकांनी माझी होणारी दुर्दशा थांबवावी आणी माझे दु:ख, वेदना समजून घ्याव्यात. माझी खंत.......' सरिता (नदी) करते का कधी खंत? असे तुम्ही माणसे माझे कौतुक करता,पण आता खरोखरच माझ्यावर खंत करण्याची वेळ आली आहे.हे पाहा, तुम्ही काय आणलयं पिशवीतून? ,' निर्माल्य!' ते ग्रामसफाई कामगार सगळ्यागावाचा,शहराचा कचरा माझ्यात आणून टाकतात. गावातील सगळे गुराखी त्यांच्या गुरांना डुंबण्यासाठी माझ्या स्वाधीन करतात.गावातील येणारे ट्रक, शहरातील रिक्षा,वाहने येथेच धुतले जातात. तसेच घरातील मैला ,सांडपाणी,घाण माझ्याच पात्रात आणून सोडतात. मग सांगा माझे पाणी कसे स्वच्छ राहणार? तुम्ही येथे येता आणि नाके मुरडता, ' किती घाण हे नदीचे पाणी ,पात्र!''' तुमच्यासाठी हे स्वच्छ मधूर पाणी घेऊन मी किती दुरुन चालत, आले आहे.! '' चालत कसली ,अगदी धावत आले.माझ्या बाबांचे - पर्वतराजाचे घर सोडताना मी क्षणभर ही थबकले नाही.कारण मला तुमच्याकडे येण्याची ओढ लागली होती.माझ्याजवळ




सोमनाथ बेलुरे
धाराशिव

जे जे काही चांगले होते, ते ते तुम्हाला द्यायचे होते ,ते मी तुम्हाला' जीवन' दिलेच पण मी वाहून आणलेल्या गाळाने माझ्या काठाची जमीन सुपीक बनवली,त्यामुळेच तुमचीशेती बहारली .तुमच्या बागा फुलल्या.तुम्ही पण कृतज्ञतेनेमाझ्या काठा वरती घाट व मंदिरे बांधलीत. आजकाल मात्र तुम्ही माणसे मला अस्वच्छ करत आहात. उपकारकर्त्याला तुम्ही विसरता आहात केव्हा केव्हा असा राग येतो की,वाटते मोठा पूर यावा आणि ही बेईमान माणसे ,गावे ,शहरे यांना जलसमाधी द्यावी.''!अशी वेळ माझ्यावर येऊ नये हे सर्वस्व तुमच्याच हातात आहे.मी स्वच्छ, निर्मळ सतत वाहत राहीन याची काळजी घ्याल ही ईच्छा .! आपली लोकमाता ....

# कर्मतपस्वी पद्मश्री डॉ.विलास डांगरे

विदर्भातच नव्हे तर संपूर्ण देशात ज्यांची ख्याती आहे. असे नागपूर येथील सुप्रसिद्ध होमिओपॅथिक तज्ञ डॉ. विलासजी डांगरे यांना भारताच्या महामहिम राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मु यांच्या हस्ते पद्मश्री पुरस्काराने डॉ. विलासराव डांगरे यांना गौरवण्यात आले.डॉ. डांगरे यांचा अल्पपरिचय :अमरावती जिल्ह्यातील चांदूरबाजार येथे १९५४ साली जन्मलेले डॉ. विलास डांगरे यांचे बालपण चांदुर बाजार येथे झाले. नागपुरातील नवयुग शाळेतून शालेय शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी १९७६ मध्ये नागपूर येथे होमिओपॅथिक कॉलेजमधून वैद्यकीय शिक्षण पूर्ण केले. त्यांची घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची होती.नागपूर येथील बहिणीकडे राहून त्यांनी आपले वैद्यकीय शिक्षण पूर्ण केले. बालपणी त्यांच्यावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे व रामकृष्ण मिशन समूहाचे संस्कार त्यांच्यावर झाले. व आजही त्या समूहाशी ते जुळलेले आहेत.डॉ.डांगरे यांनी आपल्या वैद्यकीय सेवेची सुरुवात १९७५ ला डॉ. भोयर यांच्या दवाखान्यातून केली. पुढे नागपूर येथील खामला रोडवरील सुरेंद्र नगरात त्यांनी छोटासा दवाखाना थाटला. व आजही तो छोट्या स्वरूपात एका कार्य तपस्वाच्या रूपात कार्यरत आहे. वैद्यकीय क्षेत्रात होमिओपॅथीचे प्रॅक्टिस करणारे देशात अनेक डॉक्टर आहेत. परंतु डॉ.डांगरे हे प्रसिद्धीच्या झोतात एवढे कसे काय आले? हा प्रश्न सामान्यांना पडणे स्वाभाविकचं आहे. जगात सर्वात जास्त मोबाईल धारकांची संख्या आपल्या देशात आहे. स्मार्टफोन तर अगदी लहानग्यांपासून तर ज्येष्ठांपर्यंत जणू जीवनाचा अविभाज्य अंग बनलेले आहे. परंतु डॉ. डांगरे अशाही परिस्थितीत मोबाईल वापरत नाही. त्यांना जर कोणी संपर्क क्रमांक मागितला तर सहजच ते माझ्या हॉस्पिटल ला येऊन भेटा असे म्हणतात. डॉ.विलास डांगरे हे सर्वसामान्यांचे डॉक्टर म्हणून प्रसिद्ध आहेत.'माझे जीवन हे उधारीचे आहे. व ते समाजसेवेला समर्पित आहे!'' असे ते म्हणतात.डॉक्टरकी पेशाला ते व्यवसाय म्हणून नव्हे तर समाजसेवा म्हणून बघतात. त्यांनी आतापर्यंत एक लाखाहून अधिक गरीब श्रीमंत असा भेद न ठेवता रुग्णांची अत्यंत माफक दरात रुग्णसेवा केलेली आहे.



एखादा रुग्णाकडे पैसे नसल्यास संपूर्णपणे मोफत रुग्णसेवा केल्याची उदाहरणे ही आहेत. नागपूर सारख्या शहरात त्यांच्या दवाखान्याची फी अत्यंत माफक आहे. अत्यंत मितभाषी असलेले डॉ. डांगरे नाडी परीक्षणाद्वारे रुग्णांची तपासणी करतात हा त्यांचा हातखंडा आहे. त्यांच्या दवाखान्यात उपचारा दाखल येणाऱ्या रुग्णांची भल्या पहाटे रीघ लागते. नागपुरातील सुरेंद्र नगरात छोटासा दोन खोल्यांचा दवाखाना आहे. सकाळी शंभर दोनशे व सायंकाळी शंभर दोनशे असे दररोज रुग्णांची तपासणी आजही या वयात डॉ. डांगरे करतात. त्यांच्याकडे सहकारी डॉक्टर आहेत. डॉ. डांगरेंच्या सल्ल्याने रुग्णावर उपचार होतो. सामान्यतः होमिओपॅथी डॉक्टर कडे सर्दी, खोकला आदीं सारख्या बारीक सारीक आजारावर उपचार करणारे डॉक्टर म्हणून बघितले जाते. मात्र अशी समजूत डॉ. विलासजी डांगरेंनी पूर्णपणे खोडून टाकली आहे. त्यांनी अतिशय असाध्य रोगावर सुद्धा होमिओपॅथी पद्धती द्वारे उपचार केले आहेत. त्यांच्याकडे येणारे रुग्ण हे निव्वळ महाराष्ट्रातीलच नव्हे तर मध्य प्रदेश व छत्तीसगड ह्या राज्यातून मोठ्या संख्येने येतात. मोठ्या विश्वासाने व समाधानी उपचार घेऊन परत जातात.डॉ. डांगरे यांच्या खाजगी जीवनाबद्दल बोलायचे झाल्यास ते अविवाहित आहे असे बोलले जाते.त्यांची आई असेपर्यंत त्यांच्या मागे कुटुंबाचा पाश होता. आईच्या जाण्या नंतर वैद्यकीय सेवेच्या माध्यमातून संपूर्ण समाजाचे ते झाले.२०१४ च्या सुमारास एका स्ट्रोकने त्यांची दृष्टी गेल्याचे ते सांगतात. परंतु ते खचले नाहीत दृष्टी नसूनही सहकारी डॉक्टरांच्या माध्यमातून रुग्णसेवेचा वसा अखंडित सुरू आहे. या व्यतिरिक्त सार्वजनिक जीवनातही तेवढ्यात उत्स्फूर्तपणे कार्य करतात. ते उत्तम वक्ते आहेत. न्याय,नितीमूल्ये, धर्म, संस्कृती, तरुण- तरुणीं बाबतचे मार्गदर्शन अत्यंत मोलाचे ठरते. दृष्टी नसून सुद्धा सहकाऱ्याच्या मदतीने सामाजिक संस्था,संमेलने, परिषदा,लग्न सोहळ्यात आनंदाने सहभाग दर्शवितात हे त्यांचे वैशिष्ट्ये मानली पाहिजेत. मला तीन-चार वेळा त्यांच्या वक्तृत्वाच्या माध्यमातून मार्गदर्शनाचा लाभ घेता आला. चार वर्षांपूर्वी अमरावती येथील एका सामाजिक कार्यक्रमात डॉ. डांगरेंची भेट झाली. त्यांच्याशी झालेला अल्प सुसंवाद कायम संस्मरणीय राहील. -डॉ. डांगरेंनी या दिग्गजावर केलेत उपचार - भारतरत्न गाणकोकिळा लता मंगेशकर,भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी, भारतरत्न लालकृष्ण अडवाणी, शिवसेना पक्षप्रमुख बाळासाहेब ठाकरे, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, माजी खासदार विलासजी मुत्तेमवार आदी दिग्गजांनी होमिओपॅथी पद्धतीद्वारे उपचार केले आहेत. डॉ.विलासजी डांगरे यांनी व्यक्तिगत समस्यावर मात करीत कार्य केले.त्यांची त्याग व समर्पण भावना अत्यंत प्रेरणादायी आहे. त्यांचे सहकारी डॉक्टर सुद्धा त्यांच्याच कार्यावर पाऊल ठेवीत आहे. ही त्यांच्या कार्याची मोठी उपलब्धी आहे. निव्वळ होमिओपॅथी चिकित्सक म्हणून नव्हे तर डॉ. विलासराव डांगरे हे अनेक स्वयंसेवी संस्था समितीचे अध्यक्ष आहेत व ते वृत्तपत्रीय क्षेत्रात अग्रणी असलेल्या श्री नरकेसरी प्रकाशन संस्थेचे मागील वीस वर्षांपासून अध्यक्ष सुद्धा आहेत. बहुआयामी कर्म तपस्वी सेवाव्रती व व्रतस्थ जीवन जगणारे डॉ.विलासजी डांगरे यांचे कार्य अनेकांना प्रेरणादायी ठरो हाच आशावाद. पुनश्च: एकदा त्यांच्या कार्याला सलाम व हार्दिक अभिनंदन..!,

**शशिकांत मधुकर तोटे**
**बारीपुरा दारव्हा, जि. यवतमाळ**
**मो.नं.:९१३०८३५४५८**

# तंबाखूमुक्तीचा संकल्प आरोग्याची दिशा

प्रत्येक वर्षी ३१ मे रोजी 'जागतिक तंबाखू विरोधी दिन' साजरा केला जातो. हा दिवस केवळ दिनदर्शिकेतील एक ठरलेली तारीख नसून, तंबाखूसारख्या जीवघेण्या व्यसनाविरुद्ध जनजागृतीचा आणि कृतीचा निर्धार व्यक्त करण्याचा दिवस आहे. 'तंबाखू मुक्त जीवन निरोगी जीवन' हा संदेश समाजमनात खोलवर रूजवण्याचा प्रयत्न शासन, सामाजिक संस्था आणि स्थानिक प्रशासन सातत्याने करत असते. या पार्श्वभूमीवर, श्री क्षेत्र तुळजापूर येथून एक सकारात्मक आणि अनुकरणीय उदाहरण समोर येत आहे.लाखो भाविकांचं श्रद्धास्थान असलेल्या श्री तुळजाभवानी मंदिराच्या परिसरात स्वच्छता आणि पावित्र्य टिकवण्यासाठी मंदिर संस्थानने मोठं पाऊल उचललं आहे. तंबाखूजन्य पदार्थ खाऊन थुंकणाऱ्या व्यक्तींवर कारवाई करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हा निर्णय केवळ नियम अंमलबजावणीपुरता मर्यादित नसून, तो सामाजिक आरोग्यविषयक सजगतेचा भाग आहे. स्वतः मंदिर संस्थानचा स्वच्छता विभाग या मोहिमेत पुढाकार घेत असून,मंदिर परिसर स्वच्छ आणि तंबाखूमुक्त ठेवण्यासाठी कार्यरत आहे. हे प्रयत्न इतर धार्मिक स्थळांसाठीही प्रेरणादायी ठरू शकतात.तंबाखूच्या सेवनामुळे फुफ्फुसांचे रोग, मुखाचा कर्करोग, हृदयविकार, त्वचेचा नाश, दातांची पडझड अशा गंभीर समस्या उद्भवतात. हे आजार केवळ एकट्या व्यक्तीला नव्हे, तर संपूर्ण कुटुंबाच्या आयुष्यावर घातक परिणाम घडवतात. म्हणूनच वैयक्तिक पातळीवर या व्यसनापासून दूर राहणे आणि सामाजिक पातळीवर विरोध उभा करणे हे आजच्या काळातील सर्वात मोठं सामाजिक कर्तव्य आहे. मंदिर परिसर, शाळा, रुग्णालये आणि सार्वजनिक ठिकाणी तंबाखूजन्य पदार्थांची विक्री बंद व्हावी, यासाठी स्थानिक प्रशासन, पोलीस यंत्रणा, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक यांनी एकत्र येऊन तंबाखू विरोधी चळवळीला बळ द्यावे. ३१ मे हा दिवस केवळ प्रतीक म्हणून साजरा न करता, आपण सर्वांनी तंबाखू विरोधी जीवनशैलीचा अंगीकार करण्याचा संकल्प केला पाहिजे. आरोग्याची खरी सुरुवात ही आपल्या दैनंदिन सवयींमधून होते.चला, आपण सर्वांनी ठरवूया 'तंबाखू नाही, तरच आरोग्य उभं राहील!' आजपासून एक पाऊल तंबाखूमुक्त आरोग्याकडे!



मनोज घोडगे,
स्वच्छता निरीक्षक, श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर


हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव, ता. जि. धाराशिव येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव ) संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८० RNI NO.- 2023/90078

# मुरुममध्ये इनामी महार वतनी जमिनीसाठी आमरण उपोषण

## नायब तहसीलदारांच्या आश्वासनावर तिसऱ्या दिवशी उपोषण मागे

आरंभ मराठी | मुरुम


मुरुम शहरातील भुसनी हद्दीतील गट नंबर १२८, क्षेत्र ७ एकर ३ गुंठे इतकी इनामी महार वतनी जमीन स्वतःला म्हणजेच मूळ हक्कदारास परत मिळावी, या मागणीसाठी सुभाष यशवंत बनसोडे (रा. साठेनगर, मुरुम) यांनी २८ मेपासून तलाठी कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषण सुरू केले होते. अखेर ३० मे रोजी नायब तहसीलदार रतन काजळे यांनी लेखी आश्वासन दिल्यानंतर बनसोडे यांनी नारळपाणी पिऊन आपले उपोषण मागे घेतले.सदर जमीन पूर्वी धर्मा धोंडी मांग यांना शासनाने इनामी स्वरूपात दिली होती. मारुती मंदिर परिसराची साफसफाई, सनई-चौघडा सेवा, कोतवाल काम आदी सामाजिक सेवा करीत असल्याने ही जमीन त्यांना बहाल करण्यात आली होती. मात्र,




आता ही जमीन इतरांनी बळकावल्याचा आरोप करत सुभाष बनसोडे यांनी ती त्यांच्या नावे सातबाऱ्यावर तात्काळ नोंद करण्यात यावी, अशी मागणी केली. त्यासोबतच सन १९५४-५५ मध्ये वाटप झालेल्या महार वतनी जमिनींची यादी तात्काळ उपलब्ध करून द्यावी. गट नंबर १२८ ते १३५ पर्यंतच्या सर्व इनामी महार वतनी जमिनींची चौकशी करून त्या मूळ वारसांना परत द्याव्यात. सद्यस्थितीत या जमिनी बळकावून



बसलेल्या व्यक्तींवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशा मागण्या घेऊन उपोषणास बसले होते. उपोषणाच्या तिसऱ्या दिवशी नायब तहसीलदार रतन काजळे हे स्वतः उपोषणस्थळी दाखल झाले. त्यांनी बनसोडे यांच्याशी विविध मुद्द्यांवर चर्चा करत आश्वासन दिले की, संबंधित सर्व कागदपत्रे तलाठी कार्यालय स्तरावरून उपलब्ध करून दिली जातील आणि प्रकरणाची चौकशी केली जाईल. त्यानंतर बनसोडे यांना नायब तहसीलदार यांच्या हस्ते नारळ पाणी देत ते पिऊन उपोषण मागे घेण्यात आले. यावेळी नायब तहसीलदार रतन काजळे यांच्या सोबत मंडळ अधिकारी संदीपान माचण्णा, तलाठी सुरेश खरात, कोतवाल सतीश जाधव, ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. महेश अर्दाळे, सहकारी संदीप बाबळसुरे, लाडका भाऊ योजनेतील कर्मचारी प्रशांत राठोड व सलीम बाबुडे, तसेच अनेक ग्रामस्थ उपस्थित होते. या आंदोलनामुळे इनामी महार वतनी जमिनींच्या मूळ हक्कदारांच्या न्यायहक्कांचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. प्रशासनाने याबाबत तात्काळ कारवाई करून पारदर्शक प्रक्रिया राबवावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.



कोल्हापूर येथील श्री दत्त भिक्षालिंग मंदिरामध्ये गुरुवारनिमित्त श्रींची आंब्यांच्या राशीमध्ये पूजा मांडण्यात आली. बाळासाहेब दादर्णे,हिंमत दादर्णे, वेदांत दादर्णे, उदय नलवडे व हर्षद पाटील यांनी ही पूजा बांधली. यासाठी ५१ डझन आंब्यांचा वापर करण्यात आला होता.

# तुळजापूर बस स्थानकाच्या निकृष्ट कामाच्या विरोधात

## महाविकास आघाडी करणार बोंबमारो आंदोलन

आरंभ मराठी | तुळजापूर

तुळजापूर येथे आठ कोटी रुपये खर्चून बांधण्यात आलेल्या जुन्या बस स्थानकाचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे व बोगस करण्यात आले आहे. निविदेच्या रकमेपेक्षा डबल खर्च दाखवून महाराष्ट्र शासनाची व महामंडळाची फसवणूक केली असून, यामधील संबंधित अधिकारी, ठेकेदार व जबाबदार असणाऱ्यांवर कारवाई होत नसल्याने दिनांक ३ जून रोजी बस स्थानकासमोर महाविकास आघाडीच्या वतीने बोंबमारो आंदोलन करण्यात येणार आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, तुळजापूर येथे जुने बस स्थानक पाडून तेथे नव्याने बस स्थानक उभा करण्यात आले आहे. सदरील काम सुरू झाल्यापासून अत्यंत निकृष्ट दर्जाचे बोगस व अंदाजपत्रकाप्रमाणे न करता तसेच दुप्पट खर्च दाखवून एस टी महामंडळ, महाराष्ट्र शासन यांची फसवणूक करून कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार झाला आहे. याबाबत योग्य ती चौकशी करून संबंधित अधिकारी, ठेकेदार यांच्याकडून अपहार झालेली रक्कम वसूल करण्यात यावी, तसेच सदर काम हे वाळू व सिमेंट न वापरता दगडापासून बनलेले माती मिक्स डस्ट वापरून बांधकाम करण्यात आले आहे.




त्याबाबत वारंवार निवेदन देखील देण्यात आले. मात्र यावर कुठलीही कारवाई झालेली नाही. तसेच बस स्थानकाचे टॉप रूफ ( टेन्सल फॅब्रिक) हे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले असून, याची चौकशी करून संबंधितावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे. मात्र यावर कुठलीही कारवाई होत नसल्याने महाविकास आघाडी व घटक पक्षाच्या वतीने ३ जून रोजी लोकशाही मार्गाने जुन्या बस स्थानकासमोर बोंबमारो आंदोलन करण्यात येणार आहे. अशा प्रकारचे निवेदन तुळजापूर तहसीलदार यांना महाविकास आघाडीच्या वतीने देण्यात आले आहे. या निवेदनावर धीरज पाटील, अमोल कुतवळ, ऋषिकेश मगर ,श्याम पवार, सुनील जाधव ,सुधीर कदम ,दीपक थोरात,नरेश पेंदे, किरण यादव, आकाश शिंदे, अजय साळुंखे ,प्रदीप मगर, अक्षय कदम, अनमोल साळुंखे ,नागनाथ भांजी ,उत्तम अमृतराव, महादेव देवकर यांच्या स्वाक्षरी आहेत. या निवेदनाची प्रत तुळजापूर पोलीस निरीक्षक व विभाग नियंत्रक धाराशिव यांनाही देण्यात आली आहे.

# शिराढोण गावातून बससेवा सुरु झाल्याने विद्यार्थी आणि वयोवृद्ध नागरिकांची सोय

## बस सेवेमुळे शिराढोणच्या व्यापाराला मिळणार चालना

आरंभ मराठी | शिराढोण

कळंब तालूक्यातील शिराढोण येथे महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे मोठे व सुसज्ज बसस्थानक अस्तित्वात आहे. मात्र हे बसस्थानक गावाबाहेर असल्याने शिराढोण गावात येण्यासाठी बसस्थानक ते गाव अशी अर्धा किलोमीटर पायपीट नागरिकांना करावी लागत होती. शिराढोण गावाबाहेरुनच आजपर्यंत बस जात होत्या. मात्र गावातील शिवसेनेचे नितीन आबा पाटील यांनी या बाबत सातत्याने पाठपुरावा केला. परिवहन मंत्री तथा पालकमंत्री प्रताप सरनाईक, माजी मंत्री तानाजीराव सावंत, जि.प. माजी उपाध्यक्ष धनंजय सावंत यांच्या सुचनेनुसार नितीन पाटील यांनी निवेदने दिले होते. त्यानंतर कळंब रोड ते शिराढोण गावात प्रवेश करण्यासाठी असलेल्या उपरस्त्याच्या साईडपट्या मुरुम टाकून भरुन घेतल्या. पाटील यांनी दिलेल्या निवेदनाची दखल घेवून परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी तात्काळ सदरील बससेवा ही शिराढोण गावातून व्हावी अशा सुचना दिल्या व बससेवा गावातून सूरु झाली. गावातून बससेवा सूरु झाल्याने व्यापारी, नागरिक तसेच सर्व स्तरातून समाधान व्यक्त होत आहे. पहिल्या दिवशी आलेल्या पहिल्या बसचे चालक, वाहक व येथील वाहतूक नियंत्रक यांचा गावक-यांच्या वतीने सन्मान करण्यात आला. यावेळील माजी जि.प. सदस्य शहाजीराव पाटील, नितीन आबा पाटील, उपसरंच अमोल माकोडे, नामदेव माकोडे, रामेश्वर मुंदडा, गणेश महाजन, पांडूरंग महाजन, कुंडलिक सुडके, जनार्धन महाजन, सुरेश महाजन, पंकज पाटील, चंद्रकांत सुडके आदी नागरिकांची उपस्थिती होती.



### गावातील व्यापाराला मिळणार चालना

बऱ्याच दिवसांपासून शिराढोणकरांची गावातून बस यावी अशी अपेक्षा होती. शिराढोण बाजारपेठ ही विखुरली गेली असल्याने गावातील बाजारपेठेत ग्राहक कमी झाले होते. मात्र आता गावातून बससेवा सुरू झाल्याने व गावात तीन ठिकाणी एसटी बस थांबत असल्याने गावातील बाजारपेठेत गजबज दिसून येत आहे. गावातून बसवाहतूक सूरु झाल्याने व्यापारास निश्चीत बळ मिळणार असून, उद्योगाला चालना मिळणार आहे.

### नागरिकांनी सहकार्य करण्याची गरज

शिराढोण गावातून बससेवा सूरु झाली आहे. मात्र नागरिकांनीही वाहतूकीची कोंडी होवू नये यासाठी काळजी घेणे गरजेचे आहे. बेशिस्तपणे कोणत्याही नागरिकांनी या बसवाहतूकीस अडथळा होईल अशी वाहने उभी करु नये. बसवाहतूकीस कुठे अडथळा आला तर नागरिकांनी चालक - वाहक यांना मदत करणे गरचेचे आहे.

# लोकमंगल मल्टीस्टेट सोसायटीच्या चेअरमनपदी पंडित लोमटे यांची निवड





आरंभ मराठी | तुळजापूर

लोकमंगल मल्टीस्टेट को-ऑपरेटीव्ह सोसायटीच्या चेअरमनपदी धाराशिवच्या पंडित गुरुनाथ लोमटे आणि व्हाईस चेअरमनपदी बालाजी भगवान शिंदे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्राबरोबरच इतर राज्यातही कार्यरत असलेल्या लोकमंगल मल्टीस्टेट को.ऑप. सोसायटीच्या संचालक मंडळाची निवडणूक (२०२५ ते २०३०) शुक्रवार, ३० मे २०२५ रोजी अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. यामध्ये अकरा संचालक बिनविरोध निवडून आले. संचालक म्हणून रोहन देशमुख, शितल शहाणे, राजेंद्र अडगळे, अजय ढोणे, जयसिंग देशमुख, पांडुरंग डोलारे, राजेंद्र पाटील, अश्विनी रेंगे, शितल बोरफळे यांची निवड करण्यात आली आहे. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून ए.आर.ओ. सदाशिव मधुकर पडदुणे यांनी काम पाहिले. याप्रसंगी आ. सुभाष देशमुख यांनी नूतन चेअरमन, व्हाईस चेअरमन व समस्त संचालकांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# दाळींब येथे एअरटेल नेटवर्कमुळे नागरिक हैराण

आरंभ मराठी | दाळिंब




उमरगा तालुक्यातील दाळींब येथे मागील काही दिवसांपासून इंटरनेट व कॉलिंग सुविधा पुरवणाऱ्या एअरटेल कंपनीच्या सेवा विस्कळीत होत असल्याने नागरिक वैतागले आहेत. दाळींब येथील हजारो नागरिक एअरटेल कंपनीचा सिमकार्ड वापरतात परंतु, मागील काही दिवसांपासून इंटरनेट सेवा व कॉलिंग सेवा पुरविणाऱ्या या कंपनीने ग्राहकांना वाऱ्यावर सोडले आहे. ४ जी, ५ जी सेवा पुरविणाऱ्या या कंपन्यांचे नेटवर्क अतिशय कुचकामी ठरत आहे. याचा मनस्ताप व्यवसायिक, व्यापारी, विद्यार्थी यांच्यासह सर्वसामान्य ग्राहकांना होत आहे. या स्पर्धेच्या युगात सर्व नेटवर्क कंपन्यामध्ये अग्रेसर असणाऱ्या एअरटेल कंपनीने जर व्यवस्थित सेवा दिली नाही त्यामुळे ग्राहक वैतागले आहेत. ग्राहकांना दुसऱ्या कंपनीकडे सिम पोर्ट केल्याशिवाय पर्याय नसल्याने सिम पोर्ट करण्यास सुरुवात झाल्याचे दाळींब येथे पाहायला मिळत आहे. एअरटेल कंपनीच्या नेटवर्क सेवा सुविधांबाबत अनेक ग्राहक नाराजी व्यक्त करत आहेत. कंपनीने तात्काळ खंडीत होत असलेल्या सेवा दुरुस्त करून सेवा पूर्ववत करावी अशी मागणी नागरिक करत आहेत.

# अवकाळी पावसाने झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून मदत देण्याची राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्षाची मागणी

आरंभ मराठी | परंडा

अवकाळी पावसाने व वादळी वाऱ्यामुळे शेती पिकांच्या झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना तात्काळ अर्थिक मदत करावी अशी मागणी माजी आमदार राहुल मोटे यांच्या मागदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्रजी पवार) पक्षाच्या वतीने तहसीलदार यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. तहसीलदार यांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, परंडा शहरासह तालुक्यात प्रचंड वादळी वाऱ्यांसह अवकाळी पाऊस पडला आहे. यामध्ये शेतकऱ्यांच्या शेतातील फळबागा व अनेक पिकांचे तसेच शेतजमीनीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तसेच अवकाळी पाऊस व वादळी वाऱ्यामुळे परंडा शहर व



तालुक्यात वीजपुरवठा वारंवार खंडीत होत आहे तो लवकरात लवकर सुरूळीत करावा यासाठी संबंधित विभागाला निर्देश देण्यात यावेत असे तहसीलदार यांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे. या निवेदनावर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष राहुल बनसोडे, घनश्याम शिंदे, गणी भाई हावरे, नागनाथ थोरात, दयानंद बनसोडे, संतोष लोंढे, कृष्णा चौधरी, ज्ञानेश्वर काळे, सुदाम काळे, योगेश आदलिंगे, मनोज काळे, श्रीहरी चव्हाण, दादा जाधव, तुकाराम ओहाळ यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# पशुधन व मनुष्यहानी टाळण्यासाठी जिल्ह्यात जिल्हा परिषद सर्कल निहाय वीज रोधक यंत्र-वीज अटकाव यंत्र बसवा

## शेती अभ्यासक अनिल जगताप यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

आरंभ मराठी | धाराशिव

शेतकऱ्यांचे पशुधन व मनुष्यहानी टाळण्यासाठी धाराशिव जिल्ह्यात जिल्हा परिषद सर्कल निहाय वीज रोधक यंत्र किंवा वीज अटकाव यंत्र बसवावे अशी मागणी शेती अभ्यासक अनिल जगताप यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

अवेळी विजेच्या गडगडासह येणारा पाऊस तसेच पावसाळ्यात होणाऱ्या मेघगर्जना ह्या शेतकऱ्यासाठी जीवघेण्या असतात. कधी कधी वीज पडून सामान्य माणसाचाही बळी जातो. यावर्षी मागच्या आठ दिवसापासून जिल्ह्यात वादळी वारा ,विजेच्या तांडवासह मान्सून पूर्व पावसाने कहर केला असून विज पडून शेतकऱ्याची तसेच जनावराची हानी झाल्याची नोंद झालेली आहे. मात्र वीज पडण्यापासून रोखण्यासाठी असणारे वीज अटकाव यंत्र मात्र जिल्ह्यात केवळ चारच ठिकाणी आहेत. मागील पाच वर्षात हे अटकाव यंत्र बसवले गेले नाहीत. धाराशिव जिल्ह्यात उमरगा तालुक्यातील माडज येथे तर कळंब तालुक्यातील मोहा येथे तसेच धाराशिव तालुक्यातील आंबेजवळगा येथे व तुळजापूर तालुक्यातील मसला खुर्द येथे केवळ चारच वीज अटकाव यंत्र बसवलेली आहेत. वीज पडून होणारी जीवितहानी व पशुधन वाचवण्यासाठी जिल्ह्यात जिल्हा परिषद सर्कल वाईज वीज अटकाव यंत्र बसवणे अत्यंत महत्त्वाचे आहे.विज पडून २०२० पासून झालेली मनुष्यहानी व दगावलेली जनावरे यांची संख्या लक्षात घेतली तर लक्षात येईल सन २०२० ला वीज पडून तीन व्यक्ती मयत झाल्या आहेत. तर १७७ जनावरे मयत झाली आहेत.




२०२१ ला वीज पडून एक व्यक्ती मृत झाली असून २६१ जनावरे दगावली आहेत. २०२२ ला वीज पडून चार व्यक्ती मृत्युमुखी पडले आहेत तर १२७ जनावरे दगावली आहेत. सन २०२३ ला चार व्यक्ती मृत्युमुखी पडले असून ४६ जनावरे दगावली आहेत. सन २०२४ ला वीज पडून चार व्यक्ती दगावले आहेत तर १७१ जनावरे मयत झाली आहेत. २०२५ मध्ये २१ मे पर्यंत दोन व्यक्ती वीज पडून मृत्युमुखी झालेले आहेत तर ३६ जनावरे दगावली गेली आहेत. याचा अर्थ वीज पडून धाराशिव जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात मनुष्यहानी तसेच पशुधन मयत झालेले आहे यासाठी वीज अटकाव यंत्राची धाराशिव जिल्ह्यात अत्यंत गरज आहे. वीज पडून मृत्युमुखी पडलेल्या शेतकऱ्यांना व मयत झालेल्या जनावरांना अद्यापही बऱ्याच प्रमाणात शासकीय मदत मिळाली नाही. तीही तातडीने द्यावी अशी मागणी अनिल जगताप यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

# २० दुकानात पाणी शिरले, व्यापाऱ्यांचे लाखोंचे नुकसान

## ईट येथील बस स्थानकावरील नाल्यात पावसाचे पाणी तुंबले

आरंभ मराठी | भूम

भूम तालुक्यातील ईट येथे गुरुवारी (दि.२९) सायंकाळी झालेल्या प्रचंड अतिवृष्टीमुळे मोठ्या नाल्यातील पाणी एसटी स्टँडवरील ग्रामपंचायतच्या कॉम्प्लेक्समध्ये घुसल्यामुळे व्यापाऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. बस स्टॅन्डच्या आवारामध्ये ग्रामपंचायत कार्यालयाच्या पाच शॉपिंग कॉम्प्लेक्स च्या इमारती आहेत. यामध्ये तीन मजली व दोन मजली इमारतीमध्ये तळमजले आहेत. सदर तळमजल्यावरील इमारतीच्या अंडरग्राउंड मधील दुकानांमध्ये अचानक पाणी शिरल्याने बंधाऱ्याचे स्वरूप आले होते. रात्रीच्या वेळेस पाऊस पडल्याने व्यापाऱ्यांना काहीच उपाययोजना करता आली नाही. बस स्थानकाजवळून मोठा नाला गेला आहे. या नाल्यातून पावसाचे



पाणी जात असते. परंतु हा नाला अनेक ठिकाणी बुजला गेला आहे. सदर नाल्यावर लहान पुल आहे. परंतु या पुलावर पावसाचे पाणी न बसल्यामुळे व पाऊस मोठा झाल्याने पाणी दुकानांमध्ये शिरले आहे. नाल्यातील काहीसा गाळ ग्राम पंचायतने काढला होता. परंतु पूर्णपणे पाण्याला वाट करून न दिल्यामुळे हा प्रकार घडला आहे. गेल्या पंधरा ते वीस दिवसापासून सतत पाऊस पडत असून, देखील इमारतीच्या मधील पाणी काढण्याच्या मोटर चालू नव्हत्या. गाळ्यामध्ये पाणी शिरले त्यावेळी विद्युत पुरवठा बंद करण्यात आला असल्याने उपसा करता आला नाही. तर व्यापाऱ्यांना दुकानातील माल देखील काढता आला नाही. तळमजल्यामध्ये जवळपास पाच फूट पाणी साचले होते. सदरील पाणी दुसऱ्या दिवशी काढण्यात आले. दोन्ही इमारतीमधील वीस व्यापाऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. ग्रामपंचायतने याबाबत तातडीने उपाययोजना करून सातत्याने येणाऱ्या पावसाच्या पाण्याचा बंदोबस्त करावा अशी मागणी व्यापारी वर्गातून केली जात आहे.

# मुरुम येथे लिगाडे प्लॉटमधील पाणीटंचाईच्या प्रश्नावर राष्ट्रवादी युवक काँग्रेस आक्रमक

## मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देत नगरपरिषदेला आमरण उपोषणाचा इशारा

आरंभ मराठी | मुरूम

मुरुम शहरातील नेहरूनगर परिसरातील लिगाडे प्लॉट येथे पिण्याच्या पाण्याचा तीव्र प्रश्न निर्माण झाला असून, नागरिकांना नळजोडणी मिळूनही आजतागायत पाणीपुरवठा झालेला नाही. या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी युवक काँग्रेस मुरूम शहराच्या वतीने शुक्रवारी (ता. ३० मे) नगर परिषदेचे मुख्याधिकारी यांना निवेदन देत तातडीने उपाययोजना कराव्यात, अन्यथा बेमुदत आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे. निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, लिगाडे प्लॉट भागातील मुदकण्णा वसाहतीमध्ये गेल्या अनेक वर्षांपासून पाणीटंचाई आहे. सिमेंट रस्ते करण्यापूर्वी नागरिकांना नळजोडणी देण्यात आली होती, परंतु मुख्य जलवाहिनीसोबत त्या नळजोडण्यांची जोडणीच करण्यात आलेली नाही. परिणामी, आजपर्यंत या भागातील नागरिकांना थेंब थेंब पाण्यासाठी दररोज भटकंती करावी लागते.राष्ट्रवादी युवक काँग्रेसने हे नागरिकांवर अन्यायकारक ठरत असल्याचे सांगितले. नळजोडणी असूनही पाणी न मिळाल्यामुळे नळपट्टी आकारणे म्हणजे विनाकारण आर्थिक शोषण आहे.



तसेच, या नळपट्टीचा भरणा केल्याशिवाय घरकुल आणि इतर योजनांचा लाभ देणार नाही, असा जुलमी आदेश नगर परिषदेने दिल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. लिगाडे प्लॉट मधील नळांना तातडीने पाणीपुरवठा सुरू करावा, पाणी सुरू होईपर्यंत नळपट्टीची वसुली थांबवावी, आतापर्यंत वसूल केलेली नळपट्टी नागरिकांना परत करावी, घरकुल आणि इतर लाभासाठी लावलेली नळपट्टीची अट रद्द करावी. अशा मागण्या करण्यात आल्या आहेत यावर योग्य ती कार्यवाही नाही झाल्यास नगरपरिषद कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला. या निवेदनावर बाबा कुरेशी, इमरान सय्यद, लखन भोंडवे, हुसेन तांबोळी, मोहन जाधव आदींच्या स्वाक्षऱ्या असून, त्यांनी शिष्टमंडळाच्या रूपात निवेदन सादर केले.या निवेदनाच्या अनुषंगाने नगर परिषदेचे मुख्याधिकारी सचिन भुजबळ यांनी राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या शिष्टमंडळाशी चर्चा करताना सांगितले की, तात्काळ संबंधित अधिकाऱ्यांना लिगाडे प्लॉट भागात पाठवून समस्या बाबतीत अहवाल तयार केला जाईल. तसेच, घरकुल व इतर योजनांसाठी नळपट्टीची अट रद्द करण्यात येत आहे, आणि चार दिवसांत पाणीटंचाई दूर केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. या सकारात्मक आश्वासनामुळे स्थानिक नागरिकांमध्ये एक आशेचा किरण निर्माण झाला असून, प्रशासनाकडून आता ठोस पावले उचलली जातील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## तेर येथे ५१ रक्तदात्यांचे रक्तदान

आरंभ मराठी | तेर



राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त धाराशिव तालुक्यातील तेर येथे शुक्रवारी (दि.३०) रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात २ महिलांसह ५१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. यासाठी पेठ व गोदावरी येथील सर्व समाज बांधवांनी मोलाचे सहकार्य केले.

## गाडीमध्ये आराम करणाऱ्या व्यक्तीची चार तोळ्याची चैन हिसकावली

आरंभ मराठी | वाशी



गाडीमध्ये आराम करणाऱ्या व्यक्तीची चार तोळ्याची चैन अज्ञात चार व्यक्तींनी हिसकावून पळून गेल्याची घटना वाशी तालुक्यात घडली. यासंबधी सविस्तर वृत्त असे की, बाळासाहेब प्रकाशराव पोपळे, (वय ३९ वर्षे, रा. जुना मोंढा बीड ता. जि. बीड) हे दिनांक २९ मे रोजी रात्री सात वाजता वाशी तालुक्यातील बोरी फाटा येथे गाडीमध्ये आराम करत होते. त्यावेळी अनोळखी चार व्यक्तींनी बाळासाहेब पोपळे यांच्या गळ्यातील चार तोळ्याची चैन जबरीन हिसकावून घेवून ते पळून गेले. याप्रकरणी बाळासाहेब पोपळे यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन वाशी पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०४(२),३(५) गुन्हा नोंदवला आहे.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जन्मोत्सवानिमित्त भाजपा युवा मोर्चाच्या वतीने विविध कार्यक्रम

आरंभ मराठी | धाराशिव

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्धी जन्मोत्सवानिमित्त भारतीय जनता युवा मोर्चाच्या वतीने जिल्ह्यात विविध कार्यक्रम घेण्यात आले. विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सन्मान तसेच चिमुकल्यांची वेशभूषा स्पर्धा आणि प्रेरणादायी व्याख्यान आयोजित करण्यात आले.

महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन ऑफ ट्रान्सफॉर्मेशनचे उपाध्यक्ष आ. राणाजगजितसिंह पाटील, माजी आमदार सुजितसिंह ठाकूर,माजी मंत्री बसवराज पाटील यांच्या मार्गदर्शनाने आणि भाजपा जिल्हाध्यक्ष दत्ता कुलकर्णी, भाजपा युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष राजसिंहाराजे निंबाळकर, अभियानाचे जिल्हा संयोजक इंद्रजीत देवकते यांचे नेतृत्वात हा कार्यक्रम पार पाडला. यामध्ये व्याख्यान, वेशभुषा स्पर्धा तथेच विविध क्षेत्रात नावलौकिक व योगदान देणाऱ्यांचा सत्कार व सन्मान सोहळा संपन्न झाला. इतिहास संशोधक प्रा.डॉ.सतिश कदम यांनी युवक व युवतीशी संवाद साधताना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांचे देशाप्रती असणारे योगदान तसेच महिला असूनही एक उत्तम प्रशासक व कितीही संकट आले तरी खचून न जाता प्रजेच्या संरक्षणासाठी व हितासाठी तत्पर राहणे व वेळप्रसंगी युद्धनितीतील मुत्सद्दीपणा व आजच्या काळामध्ये पालकांनी व विद्यार्थ्यांनी कश्या प्रकारचे जीवनशैली असायला पाहिजे, आपल्या पाल्याचे पालन पोषण व शिक्षण करताना अश्या विविध पैलूवर प्रकाश टाकला.यावेळी आधुनिक सावित्री प्रमाणे आपल्या पतीचा जीव वाचवणाऱ्या सौ. लता वैजिनाथ कसबे यांनी आपल्या पतीच्या दोन्ही किडण्या फेल झाल्याने किडनी दान केली म्हणून त्यांचा सत्कार करण्यात आला व आपल्या मुलाला किडनी दान करणाऱ्या माता सौ.इंदुबाई बळीराम जाधव यांचाही सत्कार करण्यात आला. त्यानंतर कराटे क्रीडा क्षेत्रातील नैपुण्य पूर्ण कामगिरी करणारे खेळाडू-साईराज अनिल माने, रमणी प्रविण म्हेत्रे, रिया राहुल माने, वेदश्री आशिष जोशी, वेदांत शरद मोटे, सतेज संजय चव्हाण, नंदन पांडुरंग गोरे, हर्षवर्धन राहुल कंकाळ, शताक्षी राहुल कंकाळ,यशराज नागनाथ धनके, आदर्श अमोल यादव, वसंत प्रशांत लोखंडे,




वसंत प्रशांत लोखंड, पार्थ नितीन पाटील,बोधिका धनजय जानराव, श्रेया धनंजय जानराव, बोराडे संस्कृती नानासाहेब. व्हॉलीबौल क्रीडा क्षेत्रातील नैपुण्य पूर्ण कामगिरी करणारे खेळाडू-कु.श्रेयश भैर खांडेकर, कु.प्रथमेश नागनाथ गंगणे, कु. सुमित संतोष जाधव, पियुष लामतुरे, प्रशिक्षक आशुतोष माने यांचा सत्कार करण्यात आला.वा क्षेत्रातील-राम ढेकणे, अतुल करवड यांचा सन्मान करण्यात आला. वेशभूषा स्पर्धेमध्ये देखील मोठ्या प्रमाणात चिमकल्यांनी अहिल्यादेवीची वेशभूषा करून सादरीकरण केले त्यामध्ये प्रामुख्याने विजेते व प्रोत्साहनपर विजेते- विजेत्याचे नाव प्रथम क्रमांक-विराक्षी लक्ष्मण देवकते, द्वि अतीय क्रमांक-वैष्णवी गणेश महानवर, तृतीय क्रमांक-गौरी आतिश ठवरे, प्रोत्साहनपर-माधवी मनोज गोरे,मानवी मनोज गोरे,रिंकू शंकर देवकते,आरती मनोज सलगर, रेवती गणेश थोरात,अमृता मनोज सलगर,विजेत्या व सहभागी स्पर्धकांना, रोख रक्कम,सन्मानपत्र व शाल देण्यात आली.श्री छत्रपती शिवरायांचे ध्येय मंत्राचे पत्र सर्व मान्यवरांना, खेळाडूंना यावेळी देण्यात आले.या कार्यक्रमासाठी ॲड.खंडेराव चौरे, सुनील काकडे,भारत डोलारे, सौ.नंदाताई पुनगुडे (जिल्हाध्यक्षा, भाजपा महिला मोर्चा), युवराज नळे,शहराध्यक्ष अभय इंगळे, मा. पांडुरंग पवार,निहाल काझी, दर्शन कोळगे, संदीप इंगळे, विलास लोंढे,निलेश शिंदे,शितल देशमुख, सतीश घोडेराव, विठ्ठल गायकवाड आदी उपस्थित होते.भाजपा युवा मोर्चाचे राजसिंहाराजे निंबाळकर यांनी प्रस्ताविक केले.जिल्ह्यातील त्रिशताब्दी बद्दलची माहिती इंद्रजीत देवकते,सूत्रसंचालन सचिन लोंढे यांनी केले व वेशभुषा स्पर्धेचे परिक्षक म्हणुन सौ. संगिता पाटील या होत्या तर आभार गणेश एडके मानले.

# पेरणीपूर्व मशागतीची कामे रखडली,खरिपावर परिणाम होणार

## शेतकऱ्यांमध्ये चिंता,अवकाळी पावसाने शेतीचे नुकसान

अमोल सुरवसे | आरंभ मराठी

नारंगवाडी ;परिसरात सततच्या पावसामुळे अनेक शेतकऱ्यांचे झाले नुकसान अवकाळीमुळे पेरणीपूर्व मशागतीची कामे थांबली असून, खरीप हंगामावर त्याचा परिणाम होणार आहे.

उमरगा तालुक्यातील नारंगवाडी, माडज परिसरात गेल्या काही दिवसांपासून सततच्या पडणाऱ्या अवकाळी पावसामुळे पेरणीपूर्व मशागतीची कामे थांबली आहेत. पाऊस थांबल्याशिवाय ही कामे करता येणार नाहीत, यामुळे शेतकरीवर्ग चिंतेत आहे. मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात पावसाने जोर धरल्याने व अधूनमधून सतत पडणाऱ्या पावसामुळे शेतीच्या मशागतीच्या कामांना ब्रेक लागला आहे. नांगरणीसह ऊसाच्या



मशागतीची कामे थांबली आहेत. ज्वारीची कापलेली बुडे फुटून ज्वारी उगवत आहे.

शेतीची मशागत करून पेरणीसाठी शेत तयार करण्याचे मोठ आव्हान शेतकऱ्यासमोर आहे. परिसरात सततच्या पावसामुळे शेतावर पाणी थांबले आहे. दरवर्षी मान्सूनपूर्व पाऊस जुनच्या



पहिल्या आठवड्यात पाऊस सुरू होतो. त्यामुळे शेतकरी मे महिन्याच्या शेवटी मशागतीचे कामे आटपून, उन्हाळी मशागती करून पावसाची प्रतीक्षा करतात, पण यावर्षी मात्र मान्सूनपूर्व आवकाळी पाऊस सतत येत आहे. यामुळे शेतकऱ्यांना शेतीच्या कामे करता येत नाहीत. मे महिन्याच्या शेवटचे १५ दिवस कडाक्याचे ऊन असते. यावर्षी मात्र कीर्तिका नक्षत्र निघाल्यापासून पावसाने जोर धरला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे शेताच्या मशागतीचे नियोजन बिघडले असून, पावसाने उघाड दिल्याशिवाय पेरणीपूर्व मशागतीची कामे करता येणार नाहीत.अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावल्याने अनेक ठिकाणी बांध फुटले असून, अनेक ठिकाणी माती वाहून गेली आहे. यामुळे मशागतीची कामे करताना अनेक अडचणी येणार आहेत.शेत रस्त्यांची कामे रखडल्यामुळे रस्ते चिखलमय झाली आहेत. यामुळे खते, बी बियाण्यांची वाहतूक करणे अडचणीचे ठरत आहे.

### पावसाने कडबा भिजला

गेल्या वर्षी पावसामुळे रब्बी पेरणी उशीरा झाल्यामुळे ज्वारी हे पीक काही जणांची पेरणी उशिरा झाल्यामुळे ज्वारी कापून टाकला असता सततच्या पावसामुळे पेरणीपूर्व जनावरांचा कडबा भिजला आहे. कडबा काळा भोर झाला आहे. वर्षभर जनावरांच्या चाऱ्याचे काय करायचे, यासाठी शेतकरीवर्ग चिंतेत आहे.

### मजुरांची चिंता

शेती पेरणी योग्य करण्याची कामे थांबली आहेत. उन्हामुळे मजुरीसाठी महिला येत नव्हत्या, आता चिखलात शेतीची मशागत करण्यासाठी मजूर भेटतील की नाही याची शेतकऱ्याना चिंता सतावत आहे.पावसाने कायम हजेरी लावल्याने पेरणी वेळेत होईल की नाही सांगता येत नाही.

– लखन जाधव, शेतकरी, नारंगवाडी

# 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात आयुक्त शेखर सिंह यांची विशेष मुलाखत

मुंबई-माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित 'जय महाराष्ट्र'कार्यक्रमात पिंपरी -चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह यांची विशेष मुलाखत प्रसारित होणार आहे.'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात शंभर दिवसांच्या कृती आराखडा उपक्रमातील अंतिम मुल्यमापन आणि 'राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान'अंतर्गत पिंपरी-चिंचवड महापालिकेने केलेली सर्वोत्तम कामगिरी या विषयावर ही मुलाखत मंगळवारी रात्री ८.०० वाजता दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवर प्रसारित होणार आहे. ज्येष्ठ निवेदक प्रसाद मोकाशी यांनी ही मुलाखत घेतली आहे.प्रशासनात सुलभता, लोकाभिमुखता, तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, कर संकलनात वाढ आणि नवनवीन उपक्रमांची अंमलबजावणी या बाबींमध्ये पिंपरी-चिंचवड महापालिकेने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. तंत्रज्ञानाचा कामकाजात प्रभावी वापर करणे आयुक्त शेखर सिंह यांची विशेष मुलाखत,मालमत्ता जप्ती लिलाव, जिओ सिक्वेन्सिंग आणि यूपीआयसी आयडी अशा महत्त्वाच्या विषयांवर महापालिकेने भर दिला आहे.

# धूम्रपान..सामाजिक आरोग्याला लागलेले ग्रहण



३१ मे हा दिवस 'जागतिक धूम्रपान विरोधी दिन' म्हणून धूम्रपानाच्या संभाव्य धोक्यांपासून जागृती करण्यासाठी साजरा केला जातो. देशात आज घडीला प्रति तीन व्यक्तींपैकी दोन व्यक्ती तंबाखूच्या व्यसनाने जखडलेले आढळून येते. प्रौढ नागरिकां सोबतच मुले सुद्धा आता तंबाखूच्या व्यसनाकडे मोठ्या संख्येने वळताना दिसतात. जागतिक आरोग्य संघटनेने 'ग्लोबल युथ टोबॅको सर्वेक्षण' दिनांक ३० मे ते ९ मे २०२५ च्या दरम्यान संपूर्ण जगभरात केले होते. हे सर्वेक्षण वय १३ ते १५ वयोगटातील विद्यार्थ्यांच्या बाबतीत होते. तसेच जून २०२५ मध्ये आंतरराष्ट्रीय तंबाखू नियंत्रण परिषद आयोजित केली असून त्यात जागतिक तंबाखू नियंत्रण तज्ञ एकत्र येतील. या सर्वेक्षणातून मिळणाऱ्या माहितीच्या आधारे चर्चा होते. त्यानंतर तंबाखू नियंत्रणाची धोरणे राबविली जातात. त्यातून तंबाखू प्रतिबंधित कार्यक्रमाला निश्चितच मदत मिळेल. तंबाखूच्या अनियंत्रित सेवनामुळे संपूर्ण जगभरात दरवर्षी आठ दशलक्ष लोकांना प्राणास मुकावे लागते. ज्यामुळे पासष्ट हजार मुले दुसऱ्या हाताने होणाऱ्या धुरांमुळे अप्रत्यक्षरीत्या मृत्युमुखी पडतात. त्यातल्या त्यात इ सिगरेट सारख्या निकोटीन आणि तंबाखू उत्पादनाच्या वाढीमुळे तंबाखू विरुद्ध नवनवीन आव्हाने उभी झालेली दिसतात. एकीकडे तंबाखू नियंत्रणात आणण्याऱ्या संस्था तर दुसरीकडे नागरिकांच्या आरोग्याशी खेळ मांडणाऱ्या जगभरातील तंबाखू उत्पादक कंपन्यांचे जाळे विक्रीचे मोठे नेटवर्क तयार करण्यात कमालीचे यशस्वी झाले आहेत. २०२२ मध्ये देशात पंधरा वर्षे आणि त्याहून अधिक वयाचे अंदाजे २५.३० कोटी लोक (२०. २ दशलक्ष पुरुष) आणि (३.५ कोटी महिला ) तंबाखू मिश्रित पदार्थाचे सेवन करीत होते. या कारणांमुळे तंबाखू मिश्रित पदार्थाच्या सेवनात भारताचे जागतिक स्तरावर दुसऱ्या क्रमांकावर आणि आग्नेय आशिया प्रदेशात तंबाखू सेवन करण्यात देशाचे प्रथम स्थान आहे. एकंदरीत ही आकडेवारी तंबाखूच्या आहारी गेलेल्यांची संख्या, त्याद्वारे ओढवलेले मृत्यू आणि तंबाखूजन्य पदार्थाची उपलब्धता ठळकपणे दर्शविते. देशात आज सार्वजनिक ठिकाणी धूम्रपान निसिद्ध मानले जाते. मात्र ते खरे पाळले जाते का? धूम्रपानाचे चलचित्र दिसत असताना धुम्रपानाचे समर्थन होत नाही असे दर्शविले जाते. तंबाखूजन्य पदार्थाच्या पॅकेजिंग वर ४०% दर्शनी भागावर तंबाखूचे सेवन मानवास अपायकारक आहे असे चित्र दर्शविले जाते. देशातील अनेक शाळा परिसरात तंबाखूजन्य पदार्थ विक्रीवर बंदी आहे. तर राज्यातील काही शाळांमध्ये तंबाखू मुक्त शाळा असे फलक लावलेले सुद्धा दिसतात. धूम्रपान विरोधी जाहिरातींच्या बाबतीत आपण आघाडीवर आहोत. परंतु निकोटीन युक्त पदार्थ सहजतेने बालकांपासून तर वयस्कर नागरिकांपर्यंत सहजतेने उपलब्ध होतात. धूम्रपान विरोधी मोहिमेत जनजागृती ही तर काळाची गरज आहेच, शिवाय तंबाखूयुक्त पदार्थाची विक्री, छुप्या जाहिराती, छुपी उपलब्धता आदींची श्रृंखला ही खंडित व्हायला पाहिजे. तंबाखू मिश्रित पदार्थाच्या सेवनामुळे होणाऱ्या नुकसानाबाबत कौटुंबिक, शैक्षणिक, सार्वजनिक, समाजात मोठी जनजागृती व्हायला पाहिजे. तथापि कठोर कायद्यांच्या अंमलबजावणीची गरज आहे. तंबाखूमुळे शारीरिक बौद्धिक उत्तेजना मिळते असे भ्रामक मनोज्ञान सांगणारे अवतीभवती अनेक अगणित आहे. अशा सवंग भ्रामक कल्पनेमुळे व्यसनाधीनता वाढत आहे. या उलट धुम्रपानामुळे होणारे व्यक्तिगत व कौटुंबिक आरोग्य नव्या नव्हे तर देशाचे, जगाचे आरोग्य दिवसेंदिवस कसे ढासळत आहे हे सांगणारे नगण्यचं आहे. धुम्रपानाशी संबंधित बाह्य सोपस्कार, प्रतिबंधित कायदे, नानाविध बंधने,जनजागृती कितीही केली तरी प्रत्येकाने मानसिक पातळीवर सजग होणे खरी काळाची गरज ठरते. तरच व्यसनमुक्त समाज दृष्टीस पडेल.

**शशिकांत मधुकर तोटे**
**दारव्हा, जि.यवतमाळ**
**मो:९१३०८३६४५८**

# तुळजापूरमध्ये पावसाचे पाणी नागरिकांच्या घरात

## नालेसफाई केली नसल्याने पाणी घरात, नागरिकांमधून तीव्र संताप

आरंभ मराठी | तुळजापूर

तुळजापूर शहरातील जिजामाता नगर भागात गुरुवारी रात्री झालेल्या पावसामुळे अनेकांच्या घरात पाणी शिरले असून नगर परिषदेने नालेसफाईकडे दुर्लक्ष केल्याने हे पाणी घरात शिरल्याने नागरिकांनी प्रशासनाच्या विरोधात संताप व्यक्त केला. यावर्षी मे महिन्यातच पावसाला सुरुवात झाली असून,गुरुवारी रात्री तुळजापूर येथे मोठा पाऊस झाला. त्यामध्ये जिजामाता नगर भागात नालेसफाई न झाल्याने पाणी वाहून न जाता ते थेट नागरिकांच्या घरात शिरले. त्यामुळे रात्रभर अनेक नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला. नगरपरिषदेने वेळेवर काम न केल्याने हे पाणी घराचे शिरल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. दरम्यान तुळजापूर नगर परिषदेचे मुख्याधिकारी अजिंक्य रणदिवे यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी फोन न उचलल्याने बोलणे होऊ शकले नाही.









### नालेसफाई गरजेची

नगरपरिषदेने वेळेवर नाले सफाई न केल्याने अनेकांच्या घरात गुरुवारी रात्री पाणी शिरले होते. त्यामुळे नाले सफाई करून घेणे गरजेचे असून तात्काळ नगर परिषदेने ही कामे करून घ्यावी.

**बालाजी तट**
सामाजिक कार्यकर्ते व रहिवासी जिजामाता नगर.

### आरोग्यास धोका निर्माण झाला आहे

आमचे घर अरुंद बोळात असून गुरुवारी रात्री पाच ते सहा घरात पाणी शिरले आहे. पाणी वाहून जाण्यासाठी रस्ता नसल्याने अनेकदा गटारीतील पाणी घरात शिरत असून आमच्या आरोग्यास यामुळे धोका निर्माण झाला आहे.

**बापूसाहेब शिंदे**
रहिवासी, जिजामाता नगर.